का. प्र.

भारत सरकार
विधि, न्याय व कंपनी कार्य मंत्रालय

सत्यमेव जयते

# सेवायोजन कार्यालये (रिक्त पदांची सूचना देणे सक्तीचे) अधिनियम, १९५९

(१९५९ चा अधिनियम क्रमांक ३१)

[१ ऑक्टोबर, १९७७ रोजी अंमलात असल्याप्रमाणे]

# The Employment Exchanges (Compulsory Notification of Vacancies) Act, 1959

(Act No. 31 of 1959)

[As in force on 1st October, 1977]

संचालक, मुद्रण व लेखन सामग्री, महाराष्ट्र शासन यांनी
भारत सरकारच्या वतीने मुद्रित व प्रकाशित केले.
(१९७८)
किंमत ४० पैसे

## सेवायोजन कार्यालये (रिक्त पदांची सूचना देणे सक्तीचे) अधिनियम, १९५९

### कलमांचा क्रम

कलमे


१. संक्षिप्त नाव, विस्तार आणि प्रारंभ.

२. व्याख्या.

३. विशिष्ट रिक्त पदांच्या संबंधात अधिनियम लागू करावयाचा नाही.

४. सेवायोजन कार्यालयांना रिक्त पदांची सूचना देणे.

५. नियोक्त्यांनी विहित नमुन्यात माहिती आणि प्रतिवेदने द्यावयाची.

६. अभिलेख किंवा दस्तऐवज पहावयास मिळण्याचा अधिकार.

७. दंड.

८. गुन्ह्यांची दखल घेणे.

९. सद्भावपूर्वक केलेल्या कारवाईला संरक्षण.

१०. नियम करण्याची शक्ती.


एच ४८३५ (१०५५—७-७८)

# सेवायोजन कार्यालये (रिक्त पदांची सूचना देणे सक्तीचे) अधिनियम, १९५९

## (१९५९ चा अधिनियम क्रमांक ३१)

सेवायोजन कार्यालयांना रिक्त पदांची सूचना देणे सक्तीचे करण्याबाबत उपबंध करण्यासाठी अधिनियम.

[ २ सप्टेंबर, १९५९ ]

भारतीय गणराज्याच्या दहाव्या वर्षी संसदेकडून पुढीलप्रमाणे अधिनियमित होवो :—

१. (१) या अधिनियमास, 'सेवायोजन कार्यालये (रिक्त पदांची सूचना देणे सक्तीचे) अधिनियम, १९५९' असे म्हणता येईल. संक्षिप्त नाव, विस्तार आणि प्रारंभ.

(२) त्याचा विस्तार[१] * * * संपूर्ण भारतभर आहे.

(३) तो राज्यामध्ये, केंद्र शासन याबाबतीत त्या राज्यासाठी **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे नियत करील अशा दिनांकाला[२] अंमलात येईल आणि निरनिराळ्या राज्यांसाठी किंवा राज्याच्या निरनिराळ्या क्षेत्रांसाठी निरनिराळे दिनांक नियत करता येतील.

२. या अधिनियमात, संदर्भामुळे अन्यथा आवश्यक नसेल तर,— व्याख्या.

(क्) "समुचित शासन" याचा अर्थ,—

(१) (क्) कोणतीही रेल्वे, मोठे बंदर, खाण किंवा तेलक्षेत्र याच्या कोणत्याही आस्थापनेच्या; किंवा

(ख्) (एक) केंद्र शासन किंवा केंद्र शासनाचा एखादा विभाग, किंवा

(दोन) जीमध्ये किमान एक्कावन्न टक्के इतके भागभांडवल केंद्र शासनाने किंवा अंशतः केंद्र शासनाने आणि अंशतः एका किंवा अधिक राज्य शासनांनी धारण केले असेल अशी कंपनी,

(तीन) केंद्रीय अधिनियमाद्वारा किंवा त्याखाली स्थापन झालेला केंद्र शासनाच्या मालकीचा किंवा त्याच्या नियंत्रणाखाली किंवा व्यवस्थापनाखाली असलेला एखादा निगम (सहकारी संस्था धरून)

याच्या मालकीच्या, त्यांच्या नियंत्रणाखालील किंवा व्यवस्थापनाखालील कोणत्याही आस्थापनेच्या संबंधात केंद्र शासन असा आहे;

(२) अन्य कोणत्याही आस्थापनेच्या संबंधात, ती अन्य आस्थापना ज्या राज्यात असेल तेथील राज्य शासन असा आहे;

(ख) "कर्मचारी" याचा अर्थ, एखाद्या आस्थापनेमध्ये पारिश्रमिकाच्या बदल्यात कोणतेही काम करण्यासाठी नेमलेली कोणतीही व्यक्ती असा आहे;

(ग) "नियोक्ता" याचा अर्थ, एखाद्या आस्थापनेमध्ये पारिश्रमिकाच्या बदल्यात कोणतेही काम करण्यासाठी एका किंवा त्यापेक्षा अधिक व्यक्तींची नेमणूक करणारी कोणतीही व्यक्ती असा आहे आणि त्यामध्ये अशा आस्थापनेतील कर्मचाऱ्यांच्या पर्यवेक्षणाचे व नियंत्रणाचे काम जिच्याकडे सोपविले असेल अशा कोणत्याही व्यक्तीचा समावेश आहे;

(घ) "सेवायोजन कार्यालय" याचा अर्थ पुढीलप्रमाणे आहे,—

(एक) कामावर ठेवून घेण्यासाठी कर्मचाऱ्यांच्या शोधात असलेल्या व्यक्ती,

(दोन) कामधंद्याच्या शोधात असलेल्या व्यक्ती, आणि

(तीन) कामधंद्याच्या शोधात असलेल्या व्यक्तींची जेथे नियुक्ती करता येईल अशी रिक्त पदे, यासंबधीच्या नोंदवह्या ठेवन किंवा अन्यथा, माहिती गोळा करण्यासाठी आणि पुरवण्यासाठी शासनाने स्थापन केलेले आणि चालवलेले कोणतेही कार्यालय किंवा स्थान असा आहे;

(ङ) "आस्थापना" याचा अर्थ पुढीलप्रमाणे आहे,—

(क) कोणतेही कार्यालय, किंवा

(ख) जेथे कोणताही उद्योग, उदीम, धंदा किंवा व्यवसाय चालवला जातो असे कोणतेही ठिकाण;

---

१ "जम्मू आणि काश्मीर राज्य खेरीजकरून" हे शब्द, केंद्रीय श्रमिक विधी (जम्मू आणि काश्मीर-पर्यंत विस्तार) अधिनियम, १९७० (१९७० चा ५१), कलम २ आणि अनुसूचीद्वारे वगळण्यात आले.

२ सर्व राज्ये आणि दिल्ली, हिमाचल प्रदेश, मणिपूर व त्रिपुरा या संघ राज्यक्षेत्रांसाठी १ मे १९६०—पाहा, अधिसूचना क्रमांक जी.एस.आर. ३८२, दिनांकित १ एप्रिल, १९६०, गॅझेट ऑफ इंडिया—विशेष, भाग दोन, कलम ३(एक), पृष्ठ १४५.



A क a क्

(च्) "सार्वजनिक क्षेत्रातील आस्थापना" याचा अर्थ,—

(१) शासन किंवा शासनाचा विभाग;

(२) 'कंपनी अधिनियम, १९५६' (१९५६ चा १) —कलम ६१७ मध्ये व्याख्या केल्याप्रमाणे शासकीय कंपनी ;

(३) केंद्रीय, प्रांतीय किंवा राज्य अधिनियमाद्वारे किंवा त्याखाली स्थापन झालेला, शासनाच्या मालकीचा किंवा त्याच्या नियंत्रणाखालील किंवा व्यवस्थापनाखालील निगम (सहकारी संस्था धरून);

(४) स्थानिक प्राधिकरण,

यांच्या मालकीची, त्यांच्या नियंत्रणाखालील किंवा व्यवस्थापनाखालील आस्थापना असा आहे;

(छ्) "खाजगी क्षेत्रातील आस्थापना" याचा अर्थ, जी आस्थापना सार्वजनिक क्षेत्रातील नसून जेथे पंचवीस किंवा त्याहून अधिक व्यक्ती पारिश्रमिकाच्या बदल्यात काम करण्यासाठी नेमण्यात आल्या आहेत ती आस्थापना असा आहे ;

(ज्) "विहित" याचा अर्थ, या अधिनियमाखाली केलेल्या नियमांद्वारे विहित केलेले असा आहे ;

(झ्) "अकुशल कार्यालयीन काम" याचा अर्थ, पुढीलपैकी कोणत्याही प्रवर्गातील कर्मचाऱ्यांनी आस्थापनेमध्ये केलेले काम असा आहे, ते असे :—

(१) दफ्तरी ;
(२) जमादार, अडली आणि चपराशी;
(३) धूळपुसपास करणारा किंवा फरास ;
(४) गठ्ठे किंवा दफ्तरणी उचलणारा ;
(५) आदेशिकावाह ;
(६) पहारेकरी;
(७) सफाईगार ;
(८) केंद्र शासन **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे अकुशल कार्यालयीन काम म्हणून घोषित करील असे कोणतेही चाकोरीचे किंवा अकुशल काम करणारा अन्य कोणताही कर्मचारी.

विशिष्ट रिक्त पदांच्या संबंधात अधिनियम लागू करावयाचा नाही.

३. (१) हा अधिनियम —

(क्) खाजगी क्षेत्रातील कोणत्याही आस्थापनेत कृषिविषयक किंवा शेतातील यंत्रांचा चालक म्हणून करावयाच्या कामधंद्याहून अन्य कोणत्याही कृषिविषयक (बागायती धरून) कामधंद्यातील;

(ख्) कोणत्याही घरकामविषयक कामधंद्यातील ;

(ग्) ज्याचा एकूण कालावधी तीन महिन्यांहून कमी आहे अशा कोणत्याही कामधंद्यातील ;

(घ्) अकुशल कार्यालयीन काम करण्याविषयीच्या कोणत्याही कामधंद्यातील ;

(ङ्) संसदेच्या कर्मचारीवर्गाशी संबंधित अशा कोणत्याही कामधंद्यातील,

रिक्त पदांच्या संबंधात लागू होणार नाही.

(२) केंद्र शासनाने **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे याबाबतीत अन्यथा निदेशित केले नाही तर हा अधिनियम—

(क्) जी रिक्त पदे पदोन्नती देऊन अथवा त्याच आस्थापनेच्या कोणत्याही शाखेतील किंवा विभागातील जास्तीचा कर्मचारीवर्ग सामावून घेऊन त्याद्वारे अथवा संघ किंवा राज्य लोकसेवा आयोगाने आणि कोणत्याही तत्सम स्वतंत्र अभिकरणाने घेतलेल्या कोणत्याही परीक्षेच्या किंवा मुलाखतीच्या निकालानुसार अथवा त्याच्या शिफारशीवरून भरण्याचे प्रस्तावित असेल अशी रिक्त पदे;

(ख्) जेथे महिन्याला साठ रुपयांहून कमी पारिश्रमिक मिळते अशा कामधंद्यातील रिक्त पदे, यांच्या संबंधात लागू होणार नाही.

सेवायोजन कार्यालयांना रिक्त पदांची सूचना देणे.

४. (१) कोणत्याही राज्यात किंवा त्यातील क्षेत्रात या अधिनियमाचा प्रारंभ झाल्यानंतर, त्या राज्यातील किंवा क्षेत्रातील सार्वजनिक क्षेत्रातील प्रत्येक नियोक्ता, त्या आस्थापनेतील कोणत्याही कामधंद्यातील कोणतेही रिक्त पद भरण्यापूर्वी, विहित असेल अशा सेवायोजन कार्यालयांना त्या रिक्त पदाची सूचना पाठवील.

(२) **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे समुचित शासन अधिसूचनेमध्ये विनिर्दिष्ट केलेला असेल अशा दिनांकापासून खाजगी क्षेत्रातील प्रत्येक आस्थापनेमधील किंवा खाजगी क्षेत्रातील कोणत्याही वर्गातील किंवा प्रवर्गातील आस्थापनांशी संबंधित असलेल्या प्रत्येक आस्थापनेमधील प्रत्येक नियोक्त्याने त्या आस्थापनेतील कोणत्याही कामधंद्यातील कोणतेही रिक्त पद भरण्यापूर्वी, विहित असेल त्याप्रमाणे त्या सेवायोजन कार्यालयाला त्या रिक्त पदाची सूचना पाठवावी अशी आज्ञा करू शकेल आणि तदनंतर नियोक्ता त्या आज्ञेचे अनुपालन करील.

(३) पोटकलम (१) किंवा पोटकलम (२) मध्ये निर्देशित केलेली रिक्त पदे कशा रीतीने सेवायोजन कार्यालयांना सूचित करावीत ते आणि अशी रिक्त पदे जेथे निर्माण झालेली आहेत, किंवा निर्माण होण्याच्या बेतात आहेत त्या कामधंद्याचा तपशील, विहित करण्यात येईल त्याप्रमाणे असेल.

(४) पोटकलम (१) आणि (२) यांतील कोणत्याही गोष्टीमुळे, कोणत्याही नियोक्त्यावर एखादे रिक्त पद भरण्यासाठी, ते रिक्त पद त्यांपैकी कोणत्यातरी पोटकलमाखाली सूचित केलेले आहे एवढ्याच कारणास्तव, सेवायोजन कार्यालयामार्फत कोणत्याही व्यक्तीची भरती करण्याचे बंधन पडते असे मानले जाणार नाही.

नियोक्त्यांनी विहित नमुन्यात माहिती आणि प्रतिवेदने द्यावयाची.

५. (१) कोणत्याही राज्यात किंवा त्यातील क्षेत्रात ह्या अधिनियमाचा प्रारंभ झाल्यानंतर, त्या राज्यातील किंवा क्षेत्रातील सार्वजनिक क्षेत्रातील प्रत्येक आस्थापनेमधील नियोक्ता त्या आस्थापनेमध्ये निर्माण झालेल्या किंवा निर्माण होण्याच्या बेतात असलेल्या रिक्त पदांच्या संबंधात विहित असेल अशी माहिती किंवा प्रतिवेदन विहित असतील अशा सेवायोजन कार्यालयांना देईल.

(२) समुचित शासन **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, त्या अधिसूचनेमध्ये विनिर्दिष्ट केलेला असेल अशा दिनांकापासून, खाजगी क्षेत्रातील प्रत्येक आस्थापनेमधील किंवा खाजगी क्षेत्रातील कोणत्याही वर्गातील किंवा प्रवर्गातील आस्थापनांशी संबंधित असलेल्या प्रत्येक आस्थापनेमधील नियोक्त्याने, अशा आस्थापनेमध्ये निर्माण झालेल्या किंवा निर्माण होण्याच्या बेतात असलेल्या रिक्त पदांबाबत विहित असेल ती माहिती किंवा प्रतिवेदन विहित करण्यात येईल अशा सेवायोजन कार्यालयांना द्यावे अशी आज्ञा करू शकेल आणि तदनंतर नियोक्ता अशा आज्ञेचे अनुपालन करील.

(३) अशी माहिती किंवा प्रतिवेदन कोणत्या नमुन्यात आणि किती कालांतरागणिक द्यावयाचे ते आणि त्यात जो तपशील असायला हवा तो विहित करण्यात येईल त्याप्रमाणे असेल.

अभिलेख किंवा दस्तऐवज पहावयास मिळण्याचा अधिकार.

६. याबाबतीत विहित करण्यात येईल अशा अधिकाऱ्याला किंवा त्याने लेखी प्राधिकृत केलेल्या कोणत्याही व्यक्तीला, कलम ५ खाली कोणतीही माहिती किंवा प्रतिवेदन सादर करण्याची आज्ञा केलेल्या कोणत्याही नियोक्त्याच्या कब्जातील कोणताही संबद्ध अभिलेख किंवा दस्तऐवज पहावयास मिळेल आणि जेथे असा अभिलेख किंवा दस्तऐवज आहे अशी त्याची समजूत असेल अशा कोणत्याही वास्तूमध्ये कोणत्याही वाजवी वेळी त्याला प्रवेश करून संबद्ध अभिलेख किंवा दस्तऐवज यांची तपासणी करता येईल किंवा त्यांच्या नकला करून घेता येतील किंवा त्या कलमाखाली आवश्यक असलेली कोणतीही माहिती मिळवण्यासाठी आवश्यक असलेला कोणताही प्रश्न विचारता येईल.

दंड.

७. (१) जर कोणत्याही नियोक्त्याने एखाद्या रिक्त पदाची सूचना त्या प्रयोजनार्थ विहित असलेल्या सेवायोजन कार्यालयांना देण्याच्या कामी कसूर करून कलम ४-पोटकलम (१) किंवा पोटकलम (२) चे व्यतिक्रमण केले तर, तो पहिल्या वेळच्या गुन्ह्याबद्दल पाचशे रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडास आणि नंतरच्या प्रत्येक गुन्ह्याबद्दल एक हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडास पात्र असेल.

(२) जर कोणतीही व्यक्ती---

(क्) कोणतीही माहिती किंवा प्रतिवेदन देण्याची तिला आज्ञा करण्यात आली असता---

(एक) अशी माहिती किंवा प्रतिवेदन देण्यास नकार देईल किंवा त्याबाबत उपेक्षा करील, किंवा

(दोन) जी खोटी असल्याचे स्वतःला माहीत आहे अशी कोणतीही माहिती किंवा असे प्रतिवेदन देईल किंवा देववील, किंवा

(तीन) कलम ५ खाली सादर करावी लागणारी कोणतीही माहिती मिळवण्यासाठी आवश्यक असलेल्या कोणत्याही प्रश्नाचे उत्तर देण्यास नकार देईल, किंवा खोटे उत्तर देईल; किंवा

(ख्) संबद्ध अभिलेख किंवा दस्तऐवज पहावयास मिळण्याच्या अधिकारास किंवा कलम ६ द्वारे प्रदान करण्यात आलेल्या प्रवेशाधिकारास प्रत्यवाय करील तर, ती व्यक्ती पहिल्या वेळच्या गुन्ह्याबद्दल दोनशे पन्नास रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडास आणि पुढील प्रत्येक गुन्ह्याबद्दल पाचशे रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडास पात्र असेल.

गुन्ह्यांची दखल घेणे.

८. या अधिनियमाखालील गुन्ह्याबद्दल, याबाबतीत विहित केला असेल तो शासकीय अधिकारी किंवा त्याने लेखी प्राधिकृत केलेली कोणतीही व्यक्ती यांच्याखेरीज किंवा त्यांच्या मंजुरीखेरीज कोणालाही कोणताही अभियोग मांडता येणार नाही.

सद्भावपूर्वक केलेल्या कारवाईला संरक्षण.

९. या अधिनियमाखाली सद्भावपूर्वक केलेल्या किंवा करण्याचे योजलेल्या कोणत्याही गोष्टीबद्दल कोणत्याही व्यक्तीविरुद्ध कोणताही दावा, अभियोग किंवा अन्य वैध कार्यवाही होऊ शकणार नाही.

नियम करण्याची शक्ती.

१० (१) केंद्र शासनाला या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारा आणि पूर्वप्रकाशनाच्या शर्तीच्या अधीनतेने नियम करता येतील.

(२) विशेषतः आणि पूर्वगामी शक्तीच्या व्यापकतेला बाध न येता, या नियमांद्वारा पुढील सर्व किंवा त्यांपैकी कोणत्याही बाबीसाठी उपबंध करता येतील, त्या बाबी अशा---

[१](क्) रिक्त पदांची सूचना कोणत्या सेवायोजन कार्यालयाला किंवा कार्यालयांना कोणत्या नमुन्यात व कोणत्या रीतीने आणि किती मुदतीत द्यावयाची ते आणि जेथे अशी रिक्त पदे निर्माण झालेली आहेत किंवा होण्याच्या बेतात आहे त्या कामधंद्याचा तपशील;

---

[१] सेवायोजन कार्यालय (रिक्त पदांची सूचना देणे सक्तीचे) नियमावली, १९६०, गॅझेट ऑफ इंडिया, १९६०, विशेष---भाग दोन, कलम ३(एक), पृष्ठ १८१ पाहा.

(ख) कलम ५ खाली आवश्यक असलेली माहिती आणि प्रतिवेदने कोणत्या नमुन्यात आणि कोणत्या रीतीने सादर करावयाची आणि त्यामध्ये कोणता तपशील अंतर्भूत असला पाहिजे;

(ग) दस्तऐवज पाहावयास मिळण्याचा आणि प्रवेश करण्याचा कलम ६ द्वारे प्रदान करण्यात आलेला अधिकार कोणत्या अधिकाऱ्यांना व कशा रीतीने वापरता येईल;

(घ) या अधिनियमाखाली विहित करावयाची किंवा करता येईल अशी अन्य कोणतीही बाब.

(३) या अधिनियमाखाली केलेले नियम, ते केल्यानंतर होईल तितक्या लवकर किमान तीस दिवसांपर्यंत संसदेच्या प्रत्येक सभागृहासमोर ठेवले जातील आणि ज्या सत्रात ते याप्रमाणे ठेवले जातील त्या किंवा त्याच्या पाठोपाठच्या सत्रात संसद करील अशा आपरिवर्तनांस ते अधीन असतील.

---

## THE EMPLOYMENT EXCHANGES (COMPULSORY NOTIFICATION OF VACANCIES) ACT, 1959

## सेवायोजन कार्यालये (रिक्त पदांची सूचना देणे सक्तीचे) अधिनियम, १९५९

### इंग्रजी-मराठी शब्दसूची

| | | |
|---|---|---|
| agricultural or farm machinery operative | कृषिविषयक किंवा शेतातील यंत्रांचा चालक | [S. 3(*1*)(*a*)] |
| bundle or record lifter | गठ्ठे किंवा दफ्तरणी उचलणारा | [S. 2(*i*)(*4*)] |
| compulsory notification of vacancies | रिक्त पदांची सूचना देणे सक्तीचे | [Long title] |
| domestic service | घरकाम | [S. 3(*1*)(*b*)] |
| dusting man | धूळपुसपास करणारा | [S. 2(*i*)(*3*)] |
| employee | कर्मचारी | [S. 2(*b*)] |
| employer | नियोक्ता | [S. 2(*c*)] |
| employment | कामधंदा | [S. 2(*d*)(*ii*)] |
| employment exchange | सेवायोजन कार्यालय | [S. 2(*d*)] |
| engage employees | कर्मचाऱ्यांना कामावर ठेवून घेणे | [S. 2(*d*)(*i*)] |
| establishment | आस्थापना | [S. 2(*e*)] |
| establishment in private sector | खाजगी क्षेत्रातील आस्थापना | [S. 2(*g*)] |
| establishment in public sector | सार्वजनिक क्षेत्रातील आस्थापना | [S. 2(*f*)] |
| have access to | पहावयास मिळणे | [S. 6] |
| horticulture | बागायती | [S. 3(*1*)(*a*)] |
| impede | प्रत्यवाय करणे | [S. 7(*2*)(*b*) |
| major port | मोठे बंदर | [S. 2(*a*)(*1*)(*a*)] |
| process server | आदेशिकावाह | [S. 2(*i*)(*5*)] |
| remuneration | पारिश्रमिक | [S. 2(*b*)] |
| require | आज्ञा करणे | [S. 5(*2*)] |
| requisition | आज्ञा | [S. 5(*2*)] |
| return | प्रतिवेदन | [S. 5(*1*)] |
| routine or unskilled work | चाकोरीचे किंवा अकुशल काम | [S. 2(*i*)(*8*)] |
| share capital | भागभांडवल | [S. 2(*a*)(*1*)(*b*)(*ii*)] |
| sweeper | सफाईगार | [S. 2(*i*)(*7*)] |
| unskilled office work | अकुशल कार्यालयीन काम | [S. 2(*i*)] |
| watchman | पहारेकरी | [S. 2(*i*)(*6*)] |

# सेवायोजन कार्यालये (रिक्त पदांची सूचना देणे सक्तीचे) अधिनियम, १९५९

# THE EMPLOYMENT EXCHANGES (COMPULSORY NOTIFICATION OF VACANCIES) ACT, 1959

## मराठी-इंग्रजी शब्दसूची

| | | |
|---|---|---|
| अकुशल कार्यालयीन काम | unskilled office work | [S. 2(*i*)] |
| आदेशिकावाह | process server | [S. 2(*i*)(*5*)] |
| आस्थापना | establishment | [S. 2(*e*)] |
| आज्ञा | requisition | [S. 5(*2*)] |
| आज्ञा करणे | require | [S. 5(*2*)] |
| कर्मचारी | employee | [S. 2(*b*)] |
| कर्मचाऱ्यांना कामावर ठेवून घेणे | engage employees | [S. 2(*d*)(*i*)] |
| कामधंदा | employment | [S. 2(*d*)(*ii*)] |
| कृषिविषयक किंवा शेतातील यंत्रांचा चालक | agricultural or farm machinery operative | [S. 3(*1*)(*a*)] |
| खाजगी क्षेत्रातील आस्थापना | establishment in private sector | [S. 2(*g*)] |
| गठ्ठे किंवा दफ्तरणी उचलणारा | bundle or record lifter | [S. 2(*i*)(*4*)] |
| घरकाम | domestic service | [S. 3(*1*)(*b*)] |
| चाकोरीचे किंवा अकुशल काम | routine or unskilled work | [S. 2(*i*)(*8*)] |
| धूळपुसपास करणारा | dusting man | [S. 2(*i*)(*3*)] |
| नियोक्ता | employer | [S. 2(*c*)] |
| पहारेकरी | watchman | [S. 2(*i*)(*6*)] |
| पहावयास मिळणे | have access to | [S. 6] |
| पारिश्रमिक | remuneration | [S. 2(*b*)] |
| प्रतिवेदन | return | [S. 5(*1*)] |
| प्रत्यवाय करणे | impede | [S. 7(*2*)(*b*)] |
| बागायती | horticulture | [S. 3(*1*)(*a*)] |
| भागभांडवल | share capital | [S. 2(*a*)(*1*) (*b*)(*ii*)] |
| मोठे बंदर | major port | [S. 2(*a*)(*1*)(*a*)] |
| रिक्त पदांची सूचना देणे सक्तीचे | compulsory notification of vacancies | [Long title] |
| सफाईगार | sweeper | [S. 2(*i*)(*7*)] |
| सार्वजनिक क्षेत्रातील आस्थापना | establishment in public sector | [S. 2(*f*)] |
| सेवायोजन कार्यालय | employment exchange | [S. 2(*d*)] |

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई